# महाराष्ट्र विधानसभा

**पाचवे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - २२**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ६४, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजय चौधरी** |
| (१) | ५० | १० | मुंबईतील शिवडी-वरळी उन्नत मार्गाचे काम एमएमआरडीएच्या वतीने करण्यात येत आहे. परंतू अद्यापही प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पूर्णपणे करण्यात आलेले नाही. तत्कालीन महानगर आयुक्त, एमएमआरडीए यांनी ताडदेव येथील पर्यायी जागेत पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले होते. परंतू आजतागायत ते पूर्ण करण्यात आलेले नाही. तसेच सदर उन्नत मार्गाचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु असून आचार्य दोंदे मार्गावर अनेक ठिकाणी विनाकारण बॅरिगेट लावून रस्ता अरुंद करण्यात आला आहे. त्यामुळे वाहतूकीला अडथळा होत आहे. त्याच प्रमाणे आचार्य दोंदे मार्गावरील पदपथाची दुरावस्था झाल्याने नागरीकास चालण्यास गैरसोयीचे होत आहे. त्यामुळे शिवडी-वरळी उन्नत मार्गातील प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन करण्यात यावे तसेच आचार्य दोंदे मार्गातील अडथळे दूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (२) | ६१ | १०० | पश्चिम द्रुतगती महामार्ग व आरे कॉलनी चेक नाका जोडरस्ता जंक्शन जवळील प्रस्तावित भुयारी मार्गाचे काम मुंबईमधील मेट्रो सिनेमाच्या भुयारी माार्गाच्या धर्तीवर करण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ६२ | १०० | पश्चिम द्रुतगती महामार्ग व जोगेश्वरी विक्रोळी जोडरस्ता जंक्शन जवळील प्रस्तावित भुयारी मार्गाचे काम मुंबईतील मेट्रो सिनेमाच्या भुयारी माार्गाच्या धर्तीवर करण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | ६४ | १०० | जोगेश्वर - विक्रोळी लिंक रस्त्यावर मेट्रो 6 चे काम प्रगती पथावर आहे सदर रस्त्याची द्रुतर्फा दुरावस्था झालेली आहे .नागरिकांना ये-जा करण्यास त्रास होत आहे .हा रस्ता विकास आराखडयात दाखविण्यात आलेला असून सदर रस्त्याचे तातडीने नुतनीकरण करण्याची आवश्यकता आहे .याकरिता निधीची तरतुद करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना . |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (५) | ८६ | १०० | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत माढा नगरपंचायत नविन शहरी पाणी पुरवठा योजनेचे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याकरिता माढा नगरपंचायत, माढा, ता.माढा जि.सोलापूर यांनी मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वाशी यांना दि.2.12.2024 रोजी मान्यता मिळणेबाबत पत्र दिले, पंरतु अदयापही त्यांस मान्यता न मिळणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (६) | ५५ | १० | मालाड (पूर्व) दिंडोशी विधानसभा क्षेत्रात उंचावर वसलेल्या लोकवसतीला तसेच मतदार संघात बहुतांश ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होत आसल्याने या भागात पाणीपुरवठ्याची समस्या गंभीर आहे. सरहू भागात पाणीपुरवठ्याची समस्या सोडवण्यासाठी या भागातील जुन्या जलवाहिन्या बदलून नवीन मोठ्या व्यसाच्या जलवाहिन्या बसविण्याबाबत पी-उत्तर विभाग सहाय्यक आयुक्त तसेच जल अभियंता यांनी समन्वयाने प्रस्ताव तयार करून सदरहू प्रस्ताव कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे), पश्चिम उपनगरे यांना सादर करण्यात येऊन व त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करून या भागातील जनतेची पाणी समस्या सोडविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर जिल्हा, वांद्रे व पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा यांना दि.12.07.2023 रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे या परिसरातील जनतेची मोठ्या प्रमाणात अपुऱ्या पाणी पुरवठा समस्येमुळे गैरसोय होत आहे. सदरहू पाणी पुरवठा समस्या सोडवण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. महेश सावंत** |
| (७) | ५६ | १०० | मुंबई मेट्रो मार्ग-3 माझ्या माहिम मतदार संघातून जात असून अदयापी माहिम-माटुंगा , दादर येथील ए.जे.मार्ग येथून जातो. सदरहू एल.जे. मार्ग येथे शिवसेना भवन आणि माहिम दरम्यान 03 मेट्रो स्टेशन येतात. सिध्दीविनायक मंदिर , शिवाजी पार्क व शितलादेवी ही स्टेशन येतात. या सर्व ठिकाणी ठिकठिकाणी बॅरिकेटस लावल्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. वाहतूकीचा खोळंबामुळे स्थानिक रहिवाशांना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्रास सहन करावा लागणे, अपुरे स्टेशन, तुटलेले फुटपाथ, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२** <br> **मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास** <br> **बाब क्रमांक: ६८, रूपये:- १२,०००/-** <br> **श्री. अमित झनक** |
| (८) | ७९ | १० | वाशिम जिल्हयातील मालेगाव नगर परिषद मध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असून त्यामुळे स्थानिक जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असणे, याबाबत उपाययोजना करुन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ८२ | १० | वाशिम जिल्हयात नागरीक्षेत्र वाढत असून मालेगाव नगर परिषदच्या प्रशासकीय इमारत सुव्यवस्थेत नसल्यामुळे नगरपरिषदेसाठी नवीन अद्ययावत इमारत बांधण्याची स्थानिकांकडून मागणी होत असून यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (१०) | ७२ | १० | पश्चिम नागपूरमध्ये जुनी आणि नवी अशी निवासी वसाहती आहेत. काही भागांमध्ये सांडपाणी व्यवस्थेचे जाळे पूर्णतः उपलब्ध नसणे, तर काही भागांमध्ये लोकसंख्येच्या सतत वाढीमुळे सांडपाणी व्यवस्थेच्या जाळयाचे अद्ययावतीकरण करणे आवश्यक झाले असणे, या व्यवस्थेतील त्रुटींमुळे रस्त्यांवर सांडपाणी वाहताना आणि मोकळया भूखंडांमध्ये साचताना दिसून येणे, रस्त्यांवर वाहणारे आणि मोकळया भूखंडांमध्ये साचलेले सांडपाणी प्रदूषणात वाढ, दुर्गंधी, डासांच्या उत्पत्तीमुळे रोगराई आणि इतर प्रकारच्या गंभीर समस्या निर्माण करत असणे, पश्चिम नागपूरमधील सर्व भागांचा सखोल अभ्यास करून येत्या २० वर्षांसाठी सांडपाणी निचऱ्याशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आखणे आणि त्यासाठी निधी मंजूर रुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (११) | ७६ | १० | नागपूर महानगरपालिकेसाठी स्वयंपूर्ण यंत्रणा उभारण्यासाठी सर्व प्रकारच्या यंत्रसामग्री, मनुष्यबळ आदींसह निधी मंजूर करणे आवश्यक असणे, नागपुरातील घनकचरा व्यवस्थापन प्रणालीत सुधारणा करणे गरजेचे असणे, नागपूर महानगरपालिकेने माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये घराघरातून कचरा संकलन आणि वाहतुकीसाठी ए.जी. एन्व्हायरो आणि बीव्हीजी इंडिया या दोन खाजगी कंपन्यांशी दहा वर्षांचा करार केला, या दोन्ही कंपन्या सर्व प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांमध्ये गुंतलेल्या असणे, या कंपन्यांना नागपूर महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने कचऱ्यात दगड, वाळू, मलबा मिसळताना आणि सार्वजनिक पैशांची लूट करताना पकडले आहे.मागील पाच वर्षांत नागपूर महानगरपालिकेने या दोन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कंपन्यांना ४०० कोटींपेक्षा अधिक रक्कम अदा करणे, सुमारे महिनाभरापूर्वी करार रद्द करण्याबाबत पुन्हा नोटीस देण्यात आली असणे, दुर्दैवाने, नागपूर महानगरपालिकेने या दोन्ही कंपन्यांना सुरूच ठेवले असून सर्व प्रकारचे गैरव्यवहार सुरू असणे, या दोन कंपन्यांचे करार तातडीने रद्द करणे आणि स्वतःची यंत्रणा उभारणे आवश्यक असून नागपूर महानगरपालिकेसाठी स्वतःची प्रणाली उभारण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (१२) | ५८ | १० | मुंबईमध्ये शेकडो किमीच्या भूमिगत मलवाहिन्या असणे, त्यांच्या सफाईसाठी मॅनहोलमध्ये माणसे उतरवली जाणे, मॅनहोलमधील विषारी वायुमुळे अनेक कंत्राटी कर्मचारी मृत्युमुखी पडणे, काही कर्मचाऱ्यांना श्वसनाचे जीवघेणे विकार जडणे, भूमिगत गटारात उतरून हाताने मैला साफ करण्यास बंदी असणे, मुंबई महापालिकेकडे आधुनिक व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामग्री उपलब्ध असताना देखील आजही सफाई कामगारांना मॅनहोलच्या घाणीत माणूस उतरवून भूमिगत गटारांची सफाई करण्यात येणे, भूमिगत गटारांमध्ये सफाई करताना गोवंडीमध्ये दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू होणे, कांदिवली येथे भूमिगत गटारातून सफाई करून बाहेर येताना कामगाराच्या अंगावरून गाडी जाणे, आतापर्यंत ४१ जणांचा भूमिगत गटारात पडून मृत्यू होणे, सफाई कामगाराच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रणाली किंवा साहित्य देण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | ५९ | १० | मुंबईमध्ये आजमितीस हिंदू व इतर धर्मियांच्या खासगी व महापालिका मिळून २०१ स्मशानभूमी व दफनभूमी असणे, अंत्यसंस्काराच्या ठिकाणी प्राथमिक स्वरूपाच्या आवश्यक सुविधा पुरविणे गरजेचे असणे, अनेक ठिकाणी अत्याधुनिक सोयीसुविधांनी पूर्ण अश्या स्मशानभूमी असणे, काही ठिकाणी विद्युत दहन वाहिनीची व्यवस्था असणे, परंतू तेथे स्थानिकांची गैरसोय होण्याच्या घटना वारंवार घडत असणे, स्मशानभूमी त्याचप्रमाणे दफनभूमी येथे स्वच्छता, बसण्याच्या जागा, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी यांची नीट देखभाल घेतली न जाणे, काही ठिकाणी दफनविधीसाठी जागा अपुरी पडणे, अनेक ठिकाणी तर स्मशानभूमी अथवा दफनभूमीकडे जाताना अनेक समस्यांचा सामना नागरीकांना करावा लागणे, स्मशानभूमी अथवा दफनभूमी परिसराची योग्य ती देखभाल करण्याबाबत आरोग्य विभाग उदासीन असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१४) | ६० | १० | मुंबईमध्ये अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, सदर इमारतींना दुरुस्तीची किंवा पुनर्विकासाची गरज असणे, यामध्ये सर्वात जास्त इमारती दक्षिण मुंबईत असणे, अश्या धोकादायक इमारतीमध्ये रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन रहात असणे, मुंबईमध्ये विविध ठिकाणी इमारतीचा भाग किंवा इमारतीची बाल्कनी कोसळण्याच्या दुर्घटना घडणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१५) | ३८ | १० | मुळा-मुठा नदी ही पुणे शहराच्या मध्यभागातून वाहते, पुणे व पिंपरी चिंचवड शहराचे नागरिकरण झपाट्याने वाढलेले असणे, शहरी व औद्योगीकरणामुळे मुळा-मुठा नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील शुद्धीकरण न केलेले मैला पाणी नदीमध्ये सोडले जाणे, पुणे महापालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आलेले मैला पाणी शुद्धीकरण प्रकल्प हे बंद असल्यामुळे पाण्यावर कुठलीही प्रक्रिया न करता मैला पाणी नदीत सोडले जाणे, यामुळे नदीचे पाणी प्रचंड प्रमाणात दूषित होणे, हे पाणी शेती किंवा इतर कुठल्याही वापरासाठी न येणे, सन 2023-2024 च्या नागरी पर्यावरण स्थिती अहवालात नमूद केल्याप्रमाणे पुणे मनपाच्या हद्दीतून जाणाऱ्या नदीच्या बहुतांश भागामध्ये वेगवेगळ्या ठिकाणावरील पाण्याच्या नमुन्याची तपासणी आणि चाचण्यानुसार निर्धारित पातळीपेक्षा जास्त प्रदूषण असणे, दरम्यान या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पुरेसे प्रयत्न न केल्याबाबत तज्ञांनी नागरी अधिकाऱ्यांवर ठपकाही ठेवणे, सबब मुळामुठा नदीच्या संवर्धनाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (१६) | ६३ | १० | उमरेड नगर परिषद, भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत जि, नागपूर येथील पिण्याच्या पाण्यासाठी अमृत 2 .0- साठी भरभोस निधि वितरीत करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ६६ | १० | उमरेड नगर परिषद,भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत येथील शहरी भागतील रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे,त्या बाबद् स्थानिक नागरिकांनी अनेकदा चांगले दर्जेदार रस्ते,नाले, व्हावेत यासाठी समंधीत प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे,परंतु स्थानिक तिन्ही ही नगर पंचायत व नगर परिषद यांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने,राज्याच्या नगरविकास विभागाने सदर तिन्ही शहरातील सिमेंट काँक्रिट रस्त्यांना भरघोस निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे त्यामुळें शासनाने तातडीने उपाययोजना करून उमरेड नगर परिषद, भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत यांना निधी वितरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१८) | ७० | १० | उमरेड नगर परिषद,भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत येथील नगर पलिका कार्यालय अतिशय जुने असून जीर्ण झाले आहे त्यामुळे सदर कर्यालीतील कर्मचारी, व नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागतो त्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाने आर्थिक निधीची तरतूद करणे आवश्यक आहे त्यामुळे शासनाने त्वरित उमरेड विधान सभा मतदार संघातील,उमरेड नगर परिषद,भिवापूर नगर पंचायत , कुही नगर पंचायत येथील नगर पलिका कार्यालय नवीन बांधकाम किंव्हा नूतनीकरण करणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ७३ | १० | उमरेड नगर परिषद, भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत येथील कर्मचारी यांची विविध पदे रिक्त असल्यामुळे , समंधित पालिका प्रशासन यांच्यावर अतिरिक्त ताण पडतो आहे,त्यामुळे पर्यायाने कर्मचारी अभावी पालिका प्रशासन मधील सर्वसामान्य नागरिकांची विविध कामे रखडलेली असणे, त्यामुळे सामान्य नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असणे, त्यामुळे नगरविकास विभागाने उमरेड विधान सभा मतदार संघातील, उमरेड नगर परिषद,भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत येथील कर्मचारी यांची विविध रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२५१, सचिवालयीन सामाजिक सेवा**<br>**बाब क्रमांक: ६९, रूपये:- ३३,६२,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (२०) | ७८ | १० | सांगोला येथील नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीसाठी सन २०२४ मध्ये रू.१० कोटी निधी राज्य शासनाकडून मंजूर करणेंत आलेला आहे. परंतु प्रशासकीय इमारत उभारण्याकरीता तसेच प्रशासकीय इमारतीमधील फर्निचर तसेच इतर साधन सामुग्रीकरीता शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. तरी शासनाने प्रशासकीय इमारतीचे काम होण्यापूर्वीच फर्निचर तसेच इतर साधन सामुग्रीकरीता निधीत तरतूद करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३६०४, स्थानिक संस्था व पंचायतराज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे.**<br>**बाब क्रमांक: ७०, रूपये:- १०,००,००,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (२१) | ४४ | १० | मालाड (पूर्व) दिंडोशी विधानसभा क्षेत्रात उंचावर वसलेल्या लोकवसतीला तसेच मतदार संघात बहुतांश ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होत आसल्याने या भागात पाणीपुरवठ्याची समस्या गंभीर आहे. सरहू भागात पाणीपुरवठ्याची समस्या सोडवण्यासाठी या भागातील जुन्या जलवाहिन्या बदलून नवीन मोठ्या व्यसाच्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जलवाहिन्या बसविण्याबाबत पी-उत्तर विभाग सहाय्यक आयुक्त तसेच जल अभियंता यांनी समन्वयाने प्रस्ताव तयार करून सदरहू प्रस्ताव कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे), पश्चिम उपनगरे यांना सादर करण्यात येऊन व त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करून या भागातील जनतेची पाणी समस्या सोडविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर जिल्हा, वांद्रे व पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा यांना दि.12.07.2023 रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे या परिसरातील जनतेची मोठ्या प्रमाणात अपुऱ्या पाणी पुरवठा समस्येमुळे गैरसोय होत आहे. सदरहू पाणी पुरवठा समस्या सोडवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ७८, रूपये:- ६,०१,५९,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२२) | ८० | १० | पुणेकरांसाठी वनाज ते रामवाडी आणि स्वारगेट ते पिंपरी या हे दोन मेट्रो मार्ग नागरिकांसाठी सुरू असणे, मेट्रोच्या रूपात पुणेकरांना एक अधिक सक्षम वाहतूक सुविधा उपलब्ध झाली असून येणाऱ्या काळात त्याचा अनुकूल परिणाम थेट शहरातील दैनंदिन वाहतूक व्यवस्थेवर होईल त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या देखील कमी करण्यात मेट्रो महत्वाची भूमिका बजावणे, खराडी येथे युवान आयटी पार्क असून येथे विविध आयटी कंपन्या शाळा कॉलेज व इतर उद्योग व्यवसाय मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे नागरिक नोकरी उद्योग व्यवसाय व राहण्यासाठी शहराच्या विविध भागात येणे, खराडी व परिसरात अनेक निवासी प्रकल्प झालेले असून भविष्यातही होणार आहे त्यामुळे खराडी, चंदननगर, वडगाव शेरी, वाघोली व इतर परिसरात प्रचंड लोकसंख्या वाढलेली आहे युवान आयटी पार्क येथे दररोज दीड ते दोन लाख नागरिक व कामगार नोकरी व उद्योग व्यवसायानिमित्त ये जा करणे, त्यामुळे पुणे नगर रस्त्यावर वाहतूक कोंडी हा अतिशय ज्वलंत प्रश्न निर्माण झालेला होणे, पुणे नगर रस्त्यावर वाघोली ते पुणे स्टेशन हे अंतर जाण्यासाठी दीड ते दोन तास वेळ लागणे. खराडी येथे येणारा कामगार वर्ग खाजगी व सार्वजनिक वाहनांचा वापर करत असल्यामुळे त्या भागात वाहतूक कोंडी नित्याची बाब होणे, सदरचा प्रश्न सोडविण्यासाठी सध्या खडकवासला कात्रज हडपसर खराडे बायपास मार्गे वाघोली असा मेट्रो मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे हा मार्ग मुख्य रस्त्याने जात असल्यामुळे युवान आयटी पार्क हे जवळ दोन किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी नागरिक कामगारांना खाजगी वाहनांचा वापर करावा लागेल आणि पर्यायाने या मेट्रो मार्गाचा वापर कमी होईल म्हणून सदर मार्ग हा खडकवासला कात्रज हडपसर मुंढवा पूल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | खराडी गाव युवान आयटी पार्क मार्गे खराडी जकात नाक्यावरून नगर रोड वाघोली कडे वळविल्यास शहराच्या विविध भागातून येणारे कामगार व नागरिक मेट्रोचा वापर करतील पर्यायाने मेट्रोचे दोन्ही मार्ग यशस्वी होतील, सबब सध्या प्रस्तावित असलेल्या खडकवासला कात्रज हडपसर खराडी बायपास ते वाघोली या मेट्रो मार्ग ऐवजी खडकवासला कात्रज हडपसर मुंढवा पूल खराडी गाव युवा नाईट पार्क खराडी जकात नाका नगर रोड मार्गे वाघोली असा बदल करून मेट्रो मार्ग सुरू करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १९ डिसेंबर, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर